(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2020

SPECIAL ISSUE-CCXXV (225)

## Domestic Violence: Impact on Indian Society




Chief Editor
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

Editor:
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

Guest Editor:
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts
College, Rohana

**The Journal is indexed in:**

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

Scanned with CamScanner

Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

*Multidisciplinary International Research Journal*

Peer-Reviewed Indexed

March - 2020
SPECIAL ISSUE –CCXXV (225)

# Domestic Violence: Impact on Indian Society

Chief Editor :
Prof. Virag.S.Gawande

Editor :
Dr Nitin A. Mathankar
Principal
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana
Guest Editor :
Prof. Deoman Umbarkar
Late Vasantrao Kolhatkar Arts College, Rohana

Aadhar International Publications
For Details Visit To : www.aadharsocial.com

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 425/-

Scanned with CamScanner

**B.Aadhar'** *International Multidisciplinary Research Journal*
**Impact Factor - ( (SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**


| | | |
|---|---|---|
| 131 | नौकरी करणा—या स्त्रियांची मानसिक स्थिती व आरोग्य<br>प्रा.डॉ.स्मिता गजभिये | 563 |
| 132 | घरेलू हिंसा एवं महिला लैगिक उत्पीड़न<br>Smt. Seema Khare / Surendra Prasad Sahu | 567 |
| 133 | भारतीय स्त्रिया आणि घरगुती हिंसाचार कायदा डॉ. कल्पना शिंदे | 572 |
| 134 | सामाजिक स्वास्थ्य में संगीत की भूमिका प्रा. अनिता शर्मा | 577 |
| 135 | साठोत्तरी हिंदी उपन्यासों में घरेलू हिंसा : कल और आज<br>प्रा.डॉ. कदम एस.एस. | 580 |
| 136 | घरेलू हिंसा मे कमी लाने मे घरेलू हिंसा से महिलाओं के संरक्षण का अधिनियम, २००५ की भूमिका का अध्ययन संजय कुमार जांगड़े | 584 |
| 137 | कौटुंविक हिंसाचार : आर्थिक पैलूंच्या संदर्भात विवेचन वैभव अर्मळ | 586 |
| 138 | सामाजिकदृष्ट्य स्त्रियांवर होणाऱ्या घरगुती हिंसाचाराच्या सध्यस्थितीचा अभ्यास डॉ. मनीषा पी. इंगळकर | 588 |
| 139 | भारत में महिलाओं के प्रति घरेलू हिंसा रोकथाम के उपाय<br>श्री० रोशन तुलसीराम गजबे | 591 |
| 140 | नोकरी करणा—या महिलांच्या किशोरवयीन मुलांच्या समस्या<br>डॉ.रोहिणी दि.मेश्राम | 594 |
| 141 | कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येचे वास्तवडॉ. श्रीनिवास नरहरी पिलगुलवार | 599 |
| 142 | कौटुंबिक हिंसाचार, प्रतिबंधक कायदे व उपाययोजना<br>प्रा.डॉ. वंदना ह. तागडे /प्रा.डॉ. गोपीचंद वाय. कठाणे | 609 |
| 143 | आधुनिक काळातील महिलांवरील हिसांचाराच्या समस्यांचे बदलते स्वरूप<br>प्रा.डॉ.व्हि.एन.कन्नाके. | 613 |
| 144 | वऱ्हाड प्रातांतील प्राचीन राजवंश डॉ. गजेन्द्र भा. ढवळे | 618 |
| 145 | महिला अत्याचारावर विचारवंतांची भूमिका . एक सामाजिक अध्ययन.<br>प्रा.डॉ. पी.एन. वाघ | 627 |
| 146 | 'पारिवारीक अत्याचार व महिला स्वास्थ्य'<br>प्रा. सौ. संगमित्रा दि. कोल्हारकर | 635 |
| 147 | म. ज्योतीबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्री विषयक विचार<br>प्रा. डॉ. संजय गोरे | 640 |
| 148 | पुरूषी मानसिकतेच्या छळातून स्त्रीहिंसा प्रा. डॉ. राजेंद्र जनार्दन कांबळे, | 643 |




Scanned with CamScanner

**B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal**
**Impact Factor - ( (SJIF) -7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

# कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येचे वास्तव

डॉ. श्रीनिवास नरहरी पिलगुलवार
समाजशास्त्र विभागप्रमुख लोकमान्य महाविद्यालय,वरोरा जि. चंद्रपूर

प्रस्तावना:

भारतीय समाजात कुटूंब संस्थेला अनन्य साधारण असे महत्व आहे. कारण कुटूब व्यवस्थेमुळेच मानवाच्या सामाजीकरणाची सुरूवात होते. जन्माला आलेल्या मानव प्राण्याला सामाजिक प्राणी बनविण्यात कुटुंवाची भुमिका महत्वाची असते. कुटूंवात खऱ्या अर्थाने व्यक्तीचे संगोपन, पालनपोषण, सुरक्षा आणि एकूणच सर्वांगीण विकास घडून येतो. व्यक्तीच्या सामाजिकरणाचे पहिले केंद्र कुटूंव हेच असते आणि त्या कुटूंवातील महिला याच व्यक्तीच्या सर्वांगीन विकासात महत्वाची भूमिका पार पाडीत असतात. कुटूंवाला विकसित करण्यात महिला प्रयत्नरत राहतात. कुटूंवातील सर्व सदस्यांच्या गरजांची पूर्तता करून देण्यात महिला कार्यरत असतात. कुटूंवातील महिला इतरांच्या सोयीसाठी आपल्या स्वतःच्या इच्छा, आकांक्षा, आवड, निवड इ. चा त्याग करून कुटूंवाची सेवा हाच आपला धर्म मानून जीवन जगत असतात. परंतू, कुटूंवासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग करून जीवन जगणारी महिला आपल्याच कुटूंबात अगदी प्राचीन काळापासून कौटूंबिक हिंसेची शिकार बनत आली आहे. मानवी समाजाच्या उदयाच्या कालखंडापासूनच स्त्री ही पुरूषसत्ताक व्यवस्थेची, पूरूषांच्या अन्याय, अत्याचाराची शिकार ठरली आहे. जसे मानवी समाजाच्या अगदी प्रथम अवस्थेत जेंव्हा मातृसत्ताक कुटूंव व्यवस्थेचा उगम झाला तेंव्हा कुटूंवाची कर्ता ही स्त्री बनली परंतू मातृसत्ताक कुटूंव व्यवस्थेचा उगम हा स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार आणि हिंसेचे प्रथम प्रतिक आहे असे मत अनेक समाजशास्त्रज्ञ मांडतात. कारण मानवी समाजाच्या उदयाच्या कालखंडात समाजात लैंगिक स्वैराचार व अराजकतेची परिस्थिती होती तेंव्हा अनेक पुरूषांनी एका स्त्री शी व एका पुरूषाचे अनेक स्त्रियांशी लैंगिक संबंध प्रस्थापित केले आणि जेंव्हा अशा स्त्रियांना लैंगिक संबंधांमूळे गर्भधारणा होऊन अपत्यप्राप्ती झाली तेंव्हा त्या स्त्रियांच्या पोटी जन्माला आलेल्या बालकांचे पितृत्व स्विकारण्यास कोणताही पुरूष नव्हता यामुळे आपसूकच पुरूषांमूळे लादल्या गेलेल्या अनैतिक मातृत्वामूळे स्त्रियांवर अपत्यांच्या पालनपोषणाचे जबाबदारी आली व या कारणामूळे मानवी समाजात मातृसत्ताक कुटूंव व्यवस्थेचाप्रथमच उदय झाला. मातृसत्ताक कुटूंब व्यवस्थेचा आदिम काळातील उदय हा स्त्रियांवरील अन्याय, अत्याचार आणि हिंसेचे सर्वात पहिले उदाहरण आहे. मातृसत्ताक कुटूंबत्व हे महिलांवर अन्यायपूर्णरित्या लादल्या गेले होते असेच म्हणावे लागेल.

आधूनिक काळातही महिलेच्या दृष्टिने सर्वात सुरक्षित ठिकाण समजल्या जाणाऱ्या कुटूंबात तिच्यावर अन्याय, अत्याचार आणि तिच्याविरूद्धहिंसा रोज घडून येत आहे. असे चित्र आपणांस समाजात पहायला मिळते. पुरूष हे लिंगभेदाच्या आधारावर महिलांवर अत्याचार करतात. महिला आणि पुरूष यांच्यातील शारिरीकविषमता ही नैसर्गिक आहे. परंतू लिंगाच्या आधारावर त्या दोघांचे करण्यात येणारे सामाजिकरण व त्यामूळेनिर्माण झालेला लिंगभाव हा समाजनिर्मित आहे असे मत स्त्रीवादी विचारवंत व्यक्त करतात. सामाजिक व सांस्कृतिक स्तरावरील स्त्री–पुरूषांच्या भूमिका आणि त्यातून पुरूषसत्ताक मानसिकतेनी निर्माण केलेली श्रेष्ठ–कनिष्ठतेची भावना म्हणजेच 'लिंगभाव' किंवा 'लिंगभेद' होय. भारतीय समाजात आजच्या स्थितीला सर्वच समाजातील, जातिधर्मातील स्त्रियांना सर्रासपणे आपल्याच कुटूंबातील नातेवाईकांकडून, आप्तस्वकीयांकडून होणाऱ्या छळास व कौटुंबिक हिंसेस [illegible]

B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal
Impact Factor - ( (SJIF) –7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

देण्यात आले आहे. घरगुती हिंसाचार हा प्रकार भारतात सर्वत्रच अस्तित्वात असणारा असला तरी सार्वजनिक जीवनात तो अदृश्य असल्याचे दिसते. कारण, अशा प्रकारच्या घरगुतीछळाबाबत साधारणत: महिलांकडून जाहीरपणे बोलले जात नाही.' (सरोदे:२००७)जागतिकीकरण आणि समाजातील वाढत चाललेली महिलांच्या विरोधी कट्टरतेच्या मानसिकतेनेही कौटूंबिक हिंसेला चालना मिळत आहे. कारण जागतिकीकरणाच्या युगात महिलांकडे उपभोगाची व प्रदर्शनाची वस्तू म्हणून पाहिल्या जात आहे. संचारमाध्यमाच्या विकासामूळे महिलांच्या कौटूंबिक हिंसेला प्रोत्साहन मिळत आहे. कौटूंबिक हिंसा ही मूलभूत अर्थाने एका कुटूंबातील स्त्री सोबत मग ती स्त्री लहान मुलगी असो, अविवाहीत किंवा विवाहीत स्त्री असो, वृद्ध महिला असो व इतर नातेदारी संबधातील कुटूंबातील महिला असोत, जेंव्हा त्या महिलांसोबत कुटूंबातील इतर सदस्यांकडून मानसिक, शारिरीक व लैंगिक छळ केला जातो त्यास कौटूंबिक हिंसा असे म्हणतात. भारतात १९८३ मध्ये प्रथमच 'कौटूंबिक हिंसाचारात' कुटूंबातील निकटवर्तीयांकडून महिलेवर होणाऱ्या शारिरीक व मानसिक अत्याचाराला गुन्हा मानण्यास प्रारंभ झाला. भारतीय दंडविधानातील कलम ४९८(अ) या कलमानुसार जर एखादया स्त्रीवर नवऱ्याने किंवा तिच्या नातेवाइकांनी शारिरीक किंवा मानसिक अत्याचार केला अथवा तिच्यासोबत क्रुरतापूर्ण वागणूक केली तर तो फौजदारी गून्हा मानण्यात येऊ लागला. समकालीन भारतीय समाजात महिलांवरीलअन्याय अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होतच आहे. स्त्री ही आज घरात व घराच्या बाहेर दोन्ही ठिकाणी सुरक्षित नाही. स्त्रियांचा कुटूंबात छळ व तिच्या विरोधात हिंसा अशा प्रकारच्या गुन्हेगारी कृत्यात अलिकडील काळात तीव्र गतीने वाढ होत आहे. अशा गुन्ह्याचा परिणाम कौटूंबिक व्यवस्थेवर नकारात्मक स्वरूपाचा पडत आहे. त्यामूळे कुटूंबाच्या विकासात अडथळे निर्माण होत आहेत. म्हणून कौटूंबिक हिंसे सारख्या समस्येचे वास्तव जाणून घेण्याचा प्रयत्न प्रस्तूत शोध निबंधात करण्यात आला आहे.

•कौटूंबिक हिंसेचा अर्थ:

कौटूंबिंक हिंसा या शब्दाचा अर्थ पाहण्यापूर्वी 'हिंसा' या शब्दाचा अर्थ जाणून घेणे आवश्यक आहे. हिंसेचा जर थोडक्यात अर्थ स्पष्ट करायचा झाला तर आपणांस असे म्हणता येईल की,"ईतरांच्या विरूद्ध शक्तीचा उपयोग म्हणजे हिंसा होय." इनसायक्लोपिडीया ऑफ क्राईम अॅन्ड जस्टीस यांच्या मते, "हिंसेचा सहसंबंध सामान्यत: अशाप्रकारच्या सर्व व्यवहाराशी आहे. ज्याच्या परिणाम स्वरूप संपत्तीचा नाश, व्यक्तीगत हानी किंवा मृत्यू होतो त्यास हिंसा असे म्हणतात."(चौधरी:२०१३)कौटूंबिक हिंसेच्या संदर्भात अनेक विचारवंतानी आपली मते नोंदविली आहेत. त्याचा आढावा पूढील प्रमाणे, (१) २००५ च्या कौटूंबिक हिंसाचार कायद्यानुसार,"अन्याय अत्याचार करणाऱ्या प्रतिपक्षाची कोणतीही कृती, वर्तणूक किंवा क्रिया ही घरगुती किंवा कौटूंबिक हिंसाचार होय."(मौने:२०१७)(२) **UNO च्या मते,**"महिलांच्या प्रति हिंसा म्हणजे स्त्री आणि पूरूषांमध्ये अशी ऐतिहासिक असमान शक्ती संबंधाची अभिव्यक्ती आहे, जी पूरूषद्वारा महिलांवर प्रभूत्व स्थापन करणे आणि भेदभावपूर्ण व्यवहार करण्याचा मार्ग दाखविते व महिलांच्या उन्नतीत अडथळे निर्माण करतात."(३) कान्ता भाटी यांच्या मते,"समाजातील सदस्यांद्वारे स्त्रीयांना मन, वचन, कर्म याद्वारे इजा करणे, त्यांच्या सोबत क्रुरतापूर्ण व्यवहार करणे. त्यांची उपेक्षा करणे, यौन शोषण करणे, यातना देणे, बलात्कार करणे, मारझोड करणे, स्त्री–भ्रूणहत्येस बाध्य करणे, महिलांसोबत छेड–छाड करणे, सती जाण्यास बाध्य करणे, हुंडयासाठी छळ करणे आणि हत्या करणे इ. प्रकारच्या हिंसेचा समावेश महिलांच्या विरूद्ध होणाऱ्या कौटूंबिक हिंसेत होतो. "(भाटी:२००८)वरील सर्व व्याख्यांवरून थोडक्यात आपणांस असे म्हणता येईल की, कुटूंबातील नातेवाईक असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या स्वास्थ, सुरक्षा, जीवन किंवा मानसिक आणि शारिरीक हानी केली जाते किंवा त्याप्र [illegible]



Scanned with CamScanner

व्यक्तीशी संबंधीत व्यक्तीला त्रास देण्यासाठी पिडीत व्यक्तीचे उत्पीडन केले जाते किंवा धमकी देऊन त्याला मानसिक दहशतीखाली ठेवल्या जाते, त्यास घरगुती हिंसा असे म्हणतात.

•पूर्व साहित्याचा आढावा:

(१)नेहा चौधरी(२०१३):

डॉ. नेहा चौधरी यांनी भारतातील कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येचे संशोधनात्मक अध्ययन केले आहे. डॉ. चौधरी यांनी 'घरेलू हिंसा एवं महिला समाज' नावाचा ग्रंथ प्रकाशित केला आहे. प्रस्तुतग्रंथात त्यांनी वाराणसीतील महिलांच्या विरोधातील हिंसाचाराच्या समस्येचे अध्ययन केले आहे. डॉ. चौधरी यांच्या मते, विवाहीत असणाऱ्या महिलांचा छळ कुटूंबात सर्वाधिक होते. त्यातही विवाह झाल्यानंतर सर्वाधिक महिलांचा छळ हा हुंडयासाठी होतो. समाजातील सर्वच स्तरातील महिलांना कमी अधिक प्रमाणात कौटूंबिक हिंसा व अत्याचाराचा सामना करावा लागतो असे मत डॉ. नेहा चौधरी आपल्या अध्ययनात स्पष्ट करतात. शिक्षित आणि सशक्त असणाऱ्या ५१.७ टक्के उत्तरदात्या महिलांना कौटूंबिक हिंसेला सामोरे जावे लागले आहे, असे मत डॉ. चौधरी यांच्या अध्ययनात निदर्शनास आले आहे. प्रस्तुत अध्ययनात ८१.७ टक्के स्त्रिया आपल्यावरील होणाऱ्या कौटूंबिक हिंसाचाऱ्याच्या विरोधात आवाज न उठविण्याचे कारण स्वतःची व कुटूंबाची बदनामी होते या कारणामुळे कुटूंबातील हिंसेला सामोरे जातात असे दिसूनआले आहे.

(२) अे. के. गुप्ते (२०१२):

ॲड. अे.के. गुप्ते यांनी २०१२ मध्ये "कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम २००५ व नियम २००६" हा ग्रंथ प्रकाशित केला. प्रस्तुत ग्रंथातकौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम २००५ याचे संक्षिप्त नाव व्याप्ती म्हणजेच कार्यक्षेत्र, व्याख्या, महिलांना सुरक्षा पुरविणारे अधिकारी, त्यांचे अधिकार आणि कर्तव्ये, पिडीतमहिलांसाठी शासनाने पार पाडावयाची कर्तव्ये, महिलांना मदतीचा आदेश मिळविण्याबाबतची कार्यपद्धती, नुकसान भरपाईचे आदेश, आर्थिकद लाभाच्या तरतूदी इ. बाबत ग्रंथाच्या पहिल्या तीन प्रकरणात चर्चा केली आहे. प्रस्तुत ग्रंथातील पुढील प्रकरणात ॲड. गुप्ते यांनी या कायद्याअंतर्गत आरोपी वरील गुन्हासिद्ध झाल्यानंतर त्याला देण्यात येणाऱ्या शिक्षांची तरतूद, पिडीत महिलेच्या समुपदेशनाची शासना मार्फत होणारी व्यवस्था, जर प्रतिवादींनी सुरक्षा आदेशाचा भंग केल्यास त्यांना मिळणारी शिक्षा, व्यथित व्यक्तीच्या अधिकाराची माहिती इ. च्या प्रस्तुत ग्रंथात मराठी व इंग्रजी अशा दोन भाषांमधून व्यवस्थित लिखाण केले आहे.

(३) एस. एन. डी. टी. विद्यापीठ स्त्री अभ्यास केंद्र(२००५):

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठातील स्त्री अभ्यास केंद्रातर्फे 'राष्ट्रीय कुटूंब आरोग्य सर्वेक्षण–२' अंतर्गत सन २००५ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात ग्रामीण व शहरी भागात आणि शहरी भागातील झोपडपट्टी अशा क्षेत्रातील एकूण ५५०० महिलांचा त्यांच्यावर झालेल्या कौटूंबिक छळाबाबत 'Violence Against Women: Some Statistical Indicates of the Nature and Extent of Domestic Violence' या विषयावर अध्ययन करण्यात आले. प्रस्तुत संशोधनाच्या अहवालात महाराष्ट्रातील महिलांच्या आपल्या कुटूंबात होणाऱ्या छळाबाबत काही तथ्य निदर्शनास आली आहेत. त्यात स्त्रीयांना कुटूंबियाकडून होणारी मारहाण, त्यांचा आपल्याच कुटूंबात होणारा शारिरीक व मानसिक छळ, त्यांचे कारणे व परिणाम याची तपशीलवार माहिती देण्यात आली आहे. संशोधन अहवालात महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील स्त्रीयांवर होणाऱ्या कौटूंबिक हिंसाचाराच्या प्रमाणात लक्षणीय रित्या वाढ होत असलेली दिसून आली आहे. स्वयंपाक करता येत नाही, वाद घालते, घरच्या लोकांची योग्यपणे काळजी घेत नाही, पर पुरुषांशी बोलते, [illegible] शेजाऱ्यांशी बोलणे

ISSN : 2278-9308
March 2020

कारणांमूळे मोठ्या प्रमाणावर स्त्रीयांच आपल्याच कुटूंबात आतोनात छळ केला जातो हे निदर्शनास आले आहे.

(४) तनिशा खंडेलवाल(२०१८):

तनिशा खंडेलवाल यांनी महिला व बाल कल्याण मंत्रालय यांच्याद्वारे पुरस्कृत " Violence Against Women: A State Level Analysis In India" या शिर्षकाखाली संशोधन करून आपला अहवाल सादर केला. प्रस्तुत संशोधन अहवालात तनिशा खंडेलवाल यांनी भारतातील वेग–वेगळ्या राज्य व केंद्रशासित प्रदेशांमध्ये महिलांच्या विरोधात घडून येणाऱ्या हिंसात्मक गुन्हाच्या नोंदीचे संख्यात्मक तथ्य मांडले आहेत. खंडेलवाल यांनी आपल्या अहवालातमहिलांच्या विरोधात होणारी कौटूंबिक हिंसा आणि अनुसूचित जाती व अनुसूचितजमातीच्या विरोधात होणारी हिंसा या संदर्भात विस्तृत अध्ययन केले आहे. खंडेलवाल यांच्या अध्ययना अंती निघालेल्या निष्कर्षाचा विचार करता असे निदर्शनास आले आहे की, दिल्ली मध्ये सर्वाधिक जास्त महिलांच्या विरोधातील हिंसेशी संबंधीत गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यानंतर उत्तर प्रदेश आणि तेलंगाना या राज्यांमध्ये महिलांवर सर्वाधिक जास्त अन्याय अत्याचार होतो हे दिसून येते. प्रस्तुत संशोधनात महिलांच्या विरोधातील कौटूंबिक हिंसेच्या गुन्ह्याचे स्वरूप पाहिले असता असे निदर्शनास आले आहे की, दिल्ली मध्ये महिलांच्या विरोधातील कौटूंबिक हिंसाचाराच्या गुन्ह्यांची सर्वाधिक जास्त नोंद करण्यात आली आहे. त्यानंतर अनुक्रमे उत्तर प्रदेश व झारखंड राज्याचा नंबर लागतो. खंडेलवाल यांनी आपल्या अध्ययनात महिलांच्या विरोधातील सर्व प्रकारच्या होणाऱ्या हिंसेच्या गुन्ह्याच्या वेग–वेगळ्या राज्यातील प्रमाणाच्या संदर्भात चर्चा करतांना त्यांनी महिलांवर ज्या राज्यांमध्ये सर्वाधिक जास्त अत्याचार केला जातो, अशा (Top Five) पाच राज्यांची यादी आपल्या अहवालात स्पष्ट केली आहे. त्यात उत्तरप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र आणि तेलंगाना इ. राज्यांचा समावेश आहे.

• अध्ययन पद्धती:

प्रस्तुत शोध निबंधाच्या अध्ययनासाठी वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करण्यात आला आहे. "वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा मुख्य उद्देश उपलब्ध तथ्य, माहिती व आकडेवारीच्या आधारावर एखादी व्यक्ती, समूह, समाज, घटना किंवा कोणताही विषय अथवा समस्यांच्या वास्तविक तथ्यांचे, वैशिष्ट्यांचे वर्णनात्मक विवेचन प्रस्तुत करणे हा आहे. या संशोधन आराखड्याचा आधार विश्वसनीय तत्व व वास्तविकता हा असतो. अशा आधारावरच तत्व व माहितीचे विश्लेषण केले जाते. या विश्लेषणातून प्राप्त नवीन माहितीचे अर्थनिरूपण केले जाते. अशा प्रक्रियेलाच वर्णनात्मक विश्लेषण असे संबोधले जाते."(कऱ्हाडे:२०११)प्रस्तुत शोध निबंधासाठी द्वितीयक तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे. तथ्य संकलनासाठी अध्ययन विषयाशी निगडीत प्रकाशित–अप्रकाशित लेख, संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, इतर संशोधकांचे संशोधन इ. आधार घेण्यात आला आहे.

• अध्ययनाचे उद्देश:

(१) कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येची ऐतिहासिक पार्श्वभूमीजाणून घेणे.

(२) कौटूंबिक हिंसाचाराची समस्या स्पष्ट करणे.

(३) भारतातील कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येचे वास्तव जाणून घेणे.

•तथ्यांचे विश्लेषण आणि निर्वचन :

भारतातील महिलांवरील होणाऱ्या वेग–वेगळ्या अत्याचाराची सुरूवात ही अगदी मानव समाजाच्या उदयापासूनन झाली आहे असे म्हटले तरी चूक होणार नाही. परंतू अभ्यासात्मकपणे विचार करायचा झाला तर वैदिक कालखंडात काही प्रमाणात स्त्रियांना पुरूषांसारखी समान वागणूक



Scanned with CamScanner

ISSN : 2278-9308
March 2020

देण्यात येत होती. या कालखंडात स्त्रियांचा सन्मान केला जात होता. धर्मसभांमध्ये त्यांना वाद–विवाद करण्याचा अधिकार होता. स्त्रियांना आपला वैवाहिक जोडीदार निवडण्याचा अधिकार प्राप्त होता. या काळात स्त्रियांचा सन्मान कुटूंबात होत असल्याने स्त्री वैदिक कालखंडात कौटूंबिक हिंसेची शिकार बनली नव्हती. इ.स. पूर्व ६०० ते ३०० वर्षा पर्यंतचा कालखंड हा 'वेदोत्तर कालखंड' म्हणून ओळखला जातो. या कालखंडात भारतात महिलांची स्थिती बदलली आणि स्त्री ही बौद्धीकदृष्ट्या पूरूषांपेक्षा हीन, दूबळी, दूय्यम आहे असे विचार समाजात रूजायला सुरूवात झाली. तत्कालीन समाजामध्ये स्त्रीयांबद्दल प्रचलित असलेल्या वैचारीक मान्यतांमध्ये बदल होऊ लागला होता. महिलाबद्दलच्या नकारात्मक विचारांना या काळात चालना मिळावयास थोड्या प्रमाणात सुरूवात झाली होती. परंतू सामाजिक, धार्मिक आणि कौटूंबिक क्षेत्रातील महिलांच्या कोणत्याही हक्कांचे व अधिकारांचे हनन करण्यास सुरूवात झाली नव्हती. अकराव्या शतकापासून भारतात मध्ययुगीन कालखंडाला सुरूवात झाली. या काळात भारतात मोगलांच्या सत्तेने आपले पाय घट्ट रोवण्यास सुरूवात केली. मोगलांचा भारतातील पहिला शासक म्हणून बाबराने आपले साम्राज्य भारतात निर्माण केले. मोगल हे स्त्रियांच्या न्याय हक्कांच्या विरोधातील होते. स्त्रियाकडे त्यांची पाहण्याची दृष्टी नकारात्मक होती, म्हणून मोगलांच्या काळात महिलांच्या दूरावस्थेला सुरूवात झाली. मुस्लीम शासकांच्या काळात बालविवाहाच्या पद्धतीस मोठ्या प्रमाणात चालना मिळाली, स्त्रियांना शिक्षणाचा हक्क नाकारण्यात आला, कुटूंबातही स्त्रियांच्या छळास सुरूवात झाली. सती प्रथेचा उगम याच काळात झाला. हा काळ महिलांवरील अनन्वीत अत्याचाराचा काळ म्हणून इतिहासात याची नोंद घेण्यात आली आहे. मध्ययुगीन कालखंड हा १८ व्या शतकापर्यंत होता.

१९ व्या शतकाच्या प्रारंभापासून ते १९६० पर्यंतच्या कालखंडास आधूनिक कालखंड म्हणून संबोधले जाते. या काळातील १९४७ पर्यंत भारतात ब्रिटीशांची सत्ता होती. ब्रिटीशांनी आपल्या जूलमी राजवटीच्या माध्यमातून येथील लोकांचे शोषण करून आपला आर्थिक विकास मोठ्या प्रमाणात केला. आधूनिक कालखंडात भारतातील स्त्रियांवरील अन्याय आणि अत्याचारांनी कहरच केला होता. स्त्रियांचे बहुतांश अधिकार पुरूषसत्ताक व्यवस्थेनी नाकारले होते. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार, कुटूंबातील निर्णय निर्धारण प्रक्रियेतील अधिकार, संपत्तीचा अधिकार, धार्मिक प्रथा परंपराच्या पालनाचा अधिकार इ. अशा अनेक प्रकारचे अधिकार नाकारण्यात आले होते. तीचे अस्तीत्व 'चूल आणि मुल' इथपर्यंतच मर्यादीत करण्यात आले होते. आपल्याच कुटूंबात व इतर नातेवाईकांमध्ये ती सर्वात दुर्लक्षित घटक म्हणून तीची गणना करण्यात येऊ लागली होती. कुटूंबातील सर्वांच्या क्रोधाचा, अन्याय अत्याचाराची, शोषणाची, हिंसेची, छळाची ती शिकार बनत चालली होती. याच कालखंडात ब्रिटीशांनी भारतातील काही समाजसुधारकांच्या स्त्री हक्कांच्या लढ्याला सकारात्मक प्रतिसाद देऊन त्यांच्यासाठी काही कायद्यात्मक तरतुदी केल्या. जसे, सती प्रथा बंदी कायदा १९२९, केशवपन प्रतिबंध कायदा, देवदासी प्रथा बंदी कायदा इ. च्या माध्यमातून स्त्रियांना न्याय देण्याचा प्रयत्न केला पण स्त्रीयांवरील अन्याय आणि अत्याचार कमी होण्याऐवजी त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत गेली. त्यातही विशेष बाब म्हणजे याच काळात महिलांवरील कौटूंबिक हिंसेला भारतात मोठ्या प्रमाणात चालना मिळत गेली.

१९६० नंतर जगभरात स्त्रीवादी विचारांचे वारे वाहू लागले. स्त्रीयांच्या मुक्त स्वातंत्र्याचा पुरस्कार करण्यासाठी, त्यांना न्याय हक्क मिळवून देण्यासाठी अनेक लढे याच काळात उभारण्यात आले. महिलांच्या सक्षमीकरणाकडे स्त्रीवादी संघटनांनी जगभर अधिक लक्ष केंद्रीत केले. १९७० च्या दशकात अमेरिकेमध्ये आणि युरोपमध्ये स्त्रीयांच्या न्याय हक्कांसाठी अनेक आंदोलने आणि चळवळी निर्माण झाल्या. अनेक स्त्रीवादी लेखक–लेखिका [illegible]



Scanned with CamScanner

**B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal**
**Impact Factor - ((SJIF) -7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

व्यक्त करू लागले. १९४९ साली **Simom-The-Bohuwa**यांनी **'The Second Sex'**नावाचा ग्रंथ लिहीला. या ग्रंथास स्त्रीवादाचे बायबल असे म्हणतात. म्हणजे १९६० ते ७० च्या दशकात पाश्चात्य राष्ट्रांमध्ये स्त्रीयांची पूरूषसत्ताक व्यवस्थेपासून मुक्ती व्हावी, पूरूषी दास्यत्वातून मुक्ती व्हावी यासाठी बेट्टी फ्रिडर, सिमान–द–बोव्हुआ इ. सारख्या स्त्रीवादी विचारवंत प्रयत्न करीत असतानाच स्त्रीयांवर अन्याय कारक ठरलेली 'कौटूंबिक हिंसेची' समस्या स्त्रीवादी विचारवंत व समाजशास्त्रज्ञांसमोर जागतिक आव्हान बनून उभे राहीली आहे. जागतिक आरोग्य संघटनेनी २००५ मध्ये प्रकाशित केलेल्या आपल्या अहवालात असे नमूद केल आहे की, "बांगलादेश, युथोपिया, टान्झानिया, पेरू इ. राष्ट्रांमध्ये ५० टक्के पेक्षा अधिक महिला आपल्या पती किंवा साथीदारांकडून शारीरिक, लैंगिक व कौटूंबिक हिंसाचाराच्या शिकार झाल्या आहेत. युथोपियाच्या ग्रामीण भागात हेच प्रमाण ७१ टक्के पर्यंत आहे. तसेच इंग्लड आणि अमेरिके सारख्या प्रगत देशातही महिला कौटूंबिक अत्याचाराच्या बळी ठरल्या आहेत. इंग्लडमध्ये पती किंवा पूर्वपती यांच्यामार्फत स्त्रीयांच्या विरोधात होणाऱ्या हिंसेचे प्रमाण ३० टक्के पर्यंत आहे. अमेरिकेतही कौटूंबिक हिंसाचाराच्या प्रमाणात वाढ होत असून सद्यस्थितीत हे प्रमाण २२ टक्के आहे. म्हणजेच प्रगत देशांमध्येही महिला कौटूंबिक अत्याचाराच्या शिकार झाल्या आहेत. केवळ जपान या देशामध्ये महिलांवर कुटूंबात होणाऱ्या अत्याचाराचे प्रमाण हे २० टक्क्यांच्या खाली आहे."(दत्त:१९९९)

भारतात प्राचीन कालखंडापासून महिलांना समाजात सर्वच स्तरांवर दुय्यम स्थान देण्यात आले आहे. महिला कौटूंबिक हिंसाचाराच्या बळी पदोपदी राहील्या आहेत. भारतात उपेक्षित, वंचित राहिलेल्या स्त्रीयांना न्याय मिळवून देण्यासाठी येथील स्त्रीवादी विचारवंतांनी ब्रिटीश राजसत्तेच्या कालखंडातच प्रस्थापित समाजव्यवस्था आणि सत्तेच्या विरोधात लढे उभारून पिडीत महिलांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न आपल्या कार्य आणि कर्तृत्वाच्या माध्यमातून केला आहे. अशा समाज सुधारकांमध्ये महात्मा ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजाराम मोहन रॉय, महर्षी कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी इ. स्त्रीवादी विचारवंताची नावे अग्रगण्य स्थानी घेतली जातात. स्वतंत्र्य भारतात भारतीय राज्यघटनेत स्त्रीयांच्या हक्काचे रक्षण करण्यासाठी अनेक घटनात्मक तरतूदी करण्यात आल्या आहेत. स्त्रीयांच्या विरोधातील अत्याचारासाठी भारतीय दंडविधान संहितेत अनेक कठोर कायद्यात्मक तरतूदीही करण्यात आल्या आहेत. परंतू स्वतंत्र भारतातही महिलांवरील अत्याचारात दिवसेंदिवस वाढच होत आहे. भारतात महिलांच्या विरोधातील कौटूंबिक हिंसेसाठी भारतीय दंडविधान संहितेच्या अनुच्छेद ४९८ नूसार गून्हा दाखल करण्यात येतो. या गून्ह्या अंतर्गत यूनिसेफ "(UNISEF) नी केलेल्या सन.२००० मधील सर्वे नूसार भारतात २० ते ५० टक्के महिलां शारिरीक, लैंगिक आणि मानसिक शोषणाच्या शिकार ठरल्या आहेत. इ.स.२००६ मध्ये महिलांच्या कौटूंबिक हिंसेच्या संदर्भात केल्या गेलेल्या Online Survey नूसार स्त्रीयांच्या मानसिक, शारिरीक आणि लैंगिक शोषणाच्या संदर्भात जे तथ्य प्राप्त झाले त्यात ४२ टक्के महिला या शारिरीक अत्याचाराच्या बळी ठरल्या म्हणजे त्यांना पती व त्याच्या इतर नातेवाईकांकडून मारपीट करण्यात येत असे. २३ टक्के महिलाशिवीगाळ करणे, धमकी देणे, नेहमी अपमानीत करणे इ. प्रकारच्या अन्यायाच्या शिकार झाल्या आहेत." (Pandey:2008)"तामिळनाडू आणि उत्तरप्रदेश मधील संशोधकांच्या अध्ययनानूसार तामिळनाडूमध्ये ३६ ते ३७ टक्के आणि उत्तरप्रदेशमध्ये ४२ ते ४८ टक्के महिलांना कौटूंबिक हिंसेच्या जाचाला बळी पडल्या आहेत. पंजाबमधील एका गावात अनुसूचितजातीच्या ७५ टक्के महिलांना दररोज आपल्या पती व इतर नातेवाईकांकडून मारपीट केली जाते."न्यायमूर्ती डॉ. पी. शेषगोपाळ यांनी [illegible]
[illegible]

**B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal**
**Impact Factor - ((SJIF) –7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

जाण्यासाठी आपल्या पतीची अनुमती घेऊनच जावे लागते. डॉ. वेणूगोपाल यांच्या मते, ६६ टक्के महिलांना त्यांनी कमावलेला पैसा खर्च करण्यासाठी आपल्या पतीला विचारूनच खर्च करावा लागतो. भारतात दर ५ महिलांपैकी ३ स्त्रिया आपल्या पतीच्या मारपीटच्या शिकार झाल्या आहेत. "(महाजन:१९९०)

भारतातील राष्ट्रीय स्तरावरील वेग–वेगळया संस्था, संघटना तसेच शासनाचे काही विभाग आणि संशोधकांच्या अभ्यास गटांनी केलेल्या पाहणी किंवा संशोधनातून कौटूंबिक हिंसाचाराबाबत निघालेल्या निष्कर्षा आधारे भारतातील कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येचा आढावा घेतला असता अनेक विदारक तथ्य समोर आलेले आपणांस पूढील प्रमाणे पाहता येईल,"राष्ट्रीय गुन्हे अहवाल(NCBR) २००५ नूसार भारतात कौटूंबिक हिंसाचारामुळे दररोज ६६ स्त्रिया आत्महत्या करतात, ६५ स्त्रिया विहीरीत, तळ्यात, नदीत किंवा इतर ठिकाणी पाण्यात बुडून मरतात, त्याचप्रमाणे ५७ स्त्रिया विष पिऊन किंवा त्यांना जबरदस्तीने विष पाजून मारले जाते. तसेच कौटूंबिक अत्याचारामुळे दररोज ३५ स्त्रियांना जाळून मारले जाते. भारतात विवाहीत स्त्रियांपैकी दोन तृतीयांश स्त्रिया कौटूंबिक हिंसाचाराला बळी पडतात. NCBR-२००५ च्या अहवालानूसारभारतात स्त्रियांवरील हिंसेच्या एकूण १५५५५३ इतक्या याचिका होत्या. त्यापैकी ६८८१० याचिका या कौटूंबिक हिंसाचाराच्या होत्या. भारतात पती आणि त्यांच्या नातेवाईकांकडून होणाऱ्या स्त्रिच्या जाचाचे प्रमाण पाहता असे निदर्शनास येते की, दर ९ मिनिटाला १ गुन्हा कौटूंबिक हिंसाचाराचा नोंदविला जातो. महिला आणि बालकल्याण विभागाने संकलित केलेल्या आकडेवारीनूसार भारतातील कौटूंबिक हिंसाचाराच्या प्रमाणात दरवर्षी ४० टक्क्यांनी वाढ होत आहे. " (मौने:२०१७)तनिशा खंडेलवाल यांनी भारतात महिलांच्या विरोधातील हिंसा या शिर्षकाखाली एका संशोधन प्रकल्पाचे अध्ययन केले असता त्यांच्या अध्ययनात असे दिसून आले आहे की,"भारतात सर्वाधिक जास्त महिलांच्या विरूद्ध कौटूंबिक हिंसाचाराचे सर्वाधिक गुन्हे हे उत्तरप्रदेशमध्ये नोंदविल्या गेले आहेत. हे स्पष्ट करण्यासाठी त्यांनी २०१६ चा NCRB चा दाखला दिला आहे. भारतात सर्वाधिक जास्त महिलांच्या विरोधातील कौटूंबिक हिंसाचाराचे गुन्हे २०१६ मध्ये उत्तरप्रदेशमध्ये ४०७ एवढे नोंदविण्यात आले होते. खंडेलवाल पूढे असेही म्हणतात की, जवळपास ९० टक्के महिला आपल्या विरोधात कुटूंबात घडून येणाऱ्या हिंसेबद्दल कधीच तक्रार करीत नाहीत. कुटूंबात आपणांस होणारा छळ हा आपल्या दैनंदिन जिवनाचाच भाग आहे. असे समजून निमूटपणे ते सहज सहन करीत असतात." भारतात महिलांच्या विरोधातील हिंसा व कौटूंबिक हिंसाचारांचे सर्वाधिक प्रमाण २०१६ च्या NCRB च्या अहवालानूसार अनूक्रमे उत्तरप्रदेश, आंध्रप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र इ. पाच राज्यांमध्ये सर्वाधिक जास्त कौटूंबिक हिंसाचाराच्या गुन्ह्यांची नोंद करण्यात आली आहे. महत्वाची बाब म्हणजे याच अहवालात कौटूंबिक हिंसाचाराच्या गुन्ह्यांची सर्वात कमी नोंद झालेल्या राज्यांमध्ये छत्तीसगढ, मेघालय, नागालॅन्ड, मनिपूर, लक्षद्वीप, अंदमान आणि निकोबार इ. राज्य व क्रेंद्रशासित प्रदेशांचा क्रमांक लागतो. म्हणजेच या अहवालाच्या अध्ययनावरून असा निष्कर्ष काढता येतो की, ज्या राज्यात मागासलेल्या समूहातील लोकांची संख्या सर्वाधिक आहे. म्हणजेच जे राज्य व क्रेंद्रशासित प्रदेश आदिवासी बहूल आहेत अशा राज्यांमध्ये कौटूंबिक हिंसाचाराच्या घटनांचे प्रमाण अत्यल्प आहे. याचा अर्थ असा की, प्रगत व विकसित समाजात महिलांच्या विरोधात कौटूंबिक हिंसाचार अधिक घडून येतो आणि आदिवासी बहूल भागात याचे प्रमाण कमी आहे.

कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येच्या संदर्भातील वास्तव जाणून घेत असतानाच देशातील पहिल्या पाच राज्यांच्या यादीमध्ये [illegible] कौटूंबिक हिंसाचाराच्या [illegible] संबधात अनेक [illegible] व संस्थानी [illegible]

**B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal**
**Impact Factor - ( (SJIF) -7.675,**
**Special Issue**
**ISSN : 2278-9308**
**March 2020**

महाराष्ट्रातही या समस्येचे स्वरूप भीषण असलेले आपणांस दिसून येते. 'नॅशनल फॅमिली हेल्थ' सर्वेने केलेल्या महाराष्ट्रातील शहरी व ग्रामीण भारतातील ५८३०स्त्रियांच्या आरोग्यविषयक स्थितीचा अभ्यास केल्यास असे लक्षात आले आहे की, महाराष्ट्रात सध्या विवाहीत असलेल्या १६ टक्के स्त्रियांवर त्यांच्या कुटूंबात त्यांना शारिरीक हिंसाचाराचा सामना करावा लागतो. राज्य गुन्हे अन्वेषण विभागाच्या (सी.आय.डी.) च्या 'महाराष्ट्रातील गुन्हे २००६' या अहवालानूसार स्त्रियांच्या विरोधातील कौटूंबिक हिंसाचाराचे प्रमाण दरवर्षी वाढत असून, पती आणि त्याच्या नातेवाईकांकडून स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाऱ्यांची दर दोन तासाला एक घटना घडत असल्याची धक्कादायक निष्कर्ष सी. आय. डी. ने आपल्या अध्ययनात काढला आहे. लॉयर्स कलेक्टिव्ह विमेन्स् राइट्स् इनिशिएटिव्हच्या फर्स्ट मॉनिटरिंग अॅन्ड इव्हॅल्यूएशन रिपोर्ट–२००७च्या अहवालानूसार, महाराष्ट्र व गोवा अशा दोन राज्यात मिळून कौटूंबिक हिंसाचार प्रतिबंध कायदा–२००५ या कायद्यांतर्गत एकूण ६०३ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या जीवनविषयक आकडेवारी २००१ चे अध्ययन केले असता असे निदर्शनास आले आहे की, स्त्रियांवर होणारा सततचा कुटूंबातील अत्याचार हा स्त्रियांच्या मृत्यूच्या प्रमूख कारणांपैकी एक आहे. असे आढळून आले आहे. महाराष्ट्रात ग्रामीण भागातील १५ते३४ वर्षे वयोगटातील स्त्रियांचे कौटूंबिक हिंसाचारामूळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण १२.७७ टक्के आहे. याशिवाय कौटूंबिक हिंसाचारामूळे होणाऱ्या आत्महत्येचे प्रमाण ६.८६ टक्के एवढे आहे, स्त्रियांच्या हत्येचे प्रमाण ०.७९ टक्के आहे व पाण्यात बुडून मरणाऱ्या पिडीत महिलांचे प्रमाण ४.९५ टक्के एवढे आहे. ही सर्व टक्केवारी एकत्र केल्यास स्त्रियांच्या मृत्यूच्या एकूण कारणांपैकी २५.३७ टक्के मृत्यू हे कौटूंबिक हिंसेशी संबंधित दिसून येतात.

उपरोक्त वरील सर्व संकलित तथ्यांच्या वर्णनात्मक विश्लेषणावरून करण्यात आलेल्या निर्वचनातून प्रस्तूत शोध–निबंधाच्या सारांश रूपाने आपणांस असे म्हणता येईल की, आजही भारतासारख्या देशात जिथे स्त्रियांना ईश्वराच्या रूपात पाहण्याच्या चर्चा होत होत्या त्याच देशात महिला आपल्याच कुटूंबातील आप्त स्वकीयांकडून प्रताडीत होत आहेत. हिंसेच्या आणि पूरूषांच्या क्रौर्याच्या शिकार बनत चालेल्या आहेत हे वैभवशाली वारसालाभलेल्या देशाच्या संस्कृतीला नक्कीच शोभणारे नाही. स्त्रियांच्या विरूद्ध कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येवर वेळीच प्रतिबंध करण्यात आला नाही तर पूढील काळात या समस्येचे भीषण परिणाम पूरूषसत्ताक मानसिकतेच्या समाजाला भोगावे लागतील. कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येमूळे भारतातील कुटूंबसंस्थेसमोर अनेक संरचनात्मक व सम समाईक प्रश्न निर्माण झाले आहेत.

**•अध्ययनाचे निष्कर्ष:**

(१) भारतात कौटूंबिक हिंसेच्या गुन्ह्याची सुरूवात इ.स.पूर्व ६०० ते ३०० च्या वेदोत्तर कालखंडात
झाली आहे.

(२) वेदोत्तर कालखंडात प्रथम स्त्री ही पूरूषांच्या घृणेची शिकार आपल्या कुटूंबात झाली आहे.

(३) भारतात मोगलांच्या काळात स्त्रियांवरील अन्याय अत्याचाराला मोठ्या प्रमाणात चालना मिळाली.

(४) मुस्लीम शासकांच्या काळात मुलींच्या बाळविवाहास सुरूवात झाली व त्याचा परिणाम म्हणून स्त्रियांवर अत्याचार वाढत गेले.

(५) ब्रिटीश कालखंडातही भारतीय स्त्री ही पूरूषसत्ताक व्यवस्थेची बळी आपल्या कुटूंबात ठरली आहे..

(६) १९६० नंतर निर्माण झालेल्या स्त्रीवादी चळवळीचा [illegible] परिणाम [illegible] हिंसाचाराच्या समस्येवर [illegible]

Scanned with CamScanner

**B.Aadhar' International Multidisciplinary Research Journal**
Impact Factor - ( (SJIF) –7.675,
Special Issue
ISSN : 2278-9308
March 2020

(७) कौटूंबिक हिंसाचाराच्या समस्येची व्याप्ती ही जगभर आहे.
(८) अमेरिका, इंग्लंड यांसारख्या प्रगत देशातही कौटूंबिक हिंसाचाराचे प्रमाण लक्षणीय आहे.
(९) भारतात आजही ४२ टक्के महिला आपल्या कुटूंबात कौटूंबिक हिंसाचाराच्या कधी ना कधी बळी ठरत असतात.
(१०)उत्तर प्रदेशमध्ये भारतात सर्वात जास्त कौटूंबिक हिंसेचा शिकार महिलांना व्हावे लागते.
(११) उत्तर प्रदेशमध्ये कौटूंबिक हिंसाचाराचे सर्वाधिक प्रमाण ४८ टक्के एवढे आहे.
(१२) भारतात आजही ६६ टक्के पैसा कमावणाऱ्या महिलांना आपल्या पतीला विचारून पैसा खर्च करावा लागतो.
(१३) भारतात दर ५ महिलांपैकी ३ महिला कौटूंबिक हिंसाचाराच्या शिकार आहेत.
(१४) NCRB २००५ च्या अहवालानूसार भारतात दररोज ६६ महिला कुटूंबातील अत्याचारामूळे आत्महत्या करतात.
(१५) भारतात दररोज ३५ महिलांना कौटूंबिक अत्याचारामूळे जाळून मारले जाते.
(१६) भारतात २ तृतीयांश महिला कौटूंबिक हिंसाचाराला बळी पडतात.
(१७) भारतात कौटूंबिक हिंसाचाराच्या प्रमाणात दरवर्षी ४० टक्के वाढ होत आहे.
(१८) अनुक्रमे उत्तर प्रदेश, आंध्रप्रदेश, राजस्थान, मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र या पाच राज्यांमध्ये कौटूंबिक हिंसाचाराचे प्रमाण सर्वाधिक आहे.
(१९) भारतात आदिवासी बहूल भागात कौटूंबिक हिंसाचाराचे प्रमाण नगण्य स्वरूपात आहे.
(२०) महाराष्ट्रात ग्रामीण भागातील १५ ते ३४ वर्षे वयोगटातील महिलांचे कौटूंबिक हिंसाचारामूळे होणाऱ्या मृत्यूचे प्रमाण १२.७७ आहे.
(२१) महाराष्ट्रात वेग–वेगळ्या कारणांनी स्त्रियांच्या होणाऱ्या मृत्यूमध्ये २५.३३ टक्के स्त्रियांचे मृत्यू हे कौटूंबिक हिंसाचारामूळे होतात.

•शिफारशी:

(१) भारतीय समाजातील कौटूंबिक हिंसा नाहीशी करण्यासाठी पूरूषसत्ताक मानसिकतेत बदल करण्याची गरज आहे.
(२) पूरूपसत्ताक मानसिकतेचे समर्थन करणाऱ्या महिलांच्या मानसिकतेत बदल करण्याची गरज आहे.
(३) स्त्रीवादी चळवळीचे विचार तळा—गाळातील लोकांपर्यंत पोहचविण्याची गरज आहे.
(४) कौटूंबिक हिंसेच्या प्रतिबंधासाठी जनजागृती आवश्यक आहे.
(५) प्रशासकीय पातळीवरील प्रयत्नांमध्ये तटस्थता निर्माण होण्याची गरज आहे.
(६) पोलीस प्रशासनातील भ्रष्टाचारावर प्रतिबंध घालणे गरजेचे आहे.
(७) कौटूंबिक हिंसा कमी करण्यासाठी महिलांच्या विरोधात सर्वाधिक हिंसा घडणाऱ्या राज्यांवर लक्ष केंद्रीत करण्याची गरज आहे.
(८) शिक्षित समाजात महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे. खऱ्या अर्थाने शिक्षित लोकांच्याच समुपदेशनाची गरज आहे.
(९) कौटूंबिक हिंसेनी पिडीत महिलेला त्वरीत न्याय मिळावा यासाठी कौटूंबिक न्यायालयांमध्ये सुद्धा Fast Track Court ची [illegible]

Scanned with CamScanner

(१०) कौटूंबिक हिंसाचारामूळे होणाऱ्या स्त्रियांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्यासाठी आणखी कठोर कायदे निर्माण करण्याची गरज आहे.

•संदर्भ ग्रंथ:

सरोदे,असीम.(२००७).*कौटूंबिक हिंसाचार आणि कायदा.* पूणे. मनोविकास प्रकाशन. *पृ.क्र.१६.*

चौधरी,नेहा.(२०१३). *घरेलू हिंसा एवम् महिला समाज.* वाराणसी. कला एवं धर्म शोध संस्थान. *पृ.क्र. १२.*

मौने,दिनेश.(२०१७). *कौटूंबिक हिंसाचार ग्रस्त महिलांच्या सामाजिक जीवनाचे अध्ययन— संदर्भ लातूर जिल्हा*(शोध प्रबंध). स्वा.रा.ती.म. विद्यापीठ. नांदेड.

भाटी, कान्ता.(२००४). *महिला उत्पीडन—दहेज प्रताडना तथा दहेज हत्या.* जयपूर. पोईन्टर पब्लिकेशन्स्.

गूप्ता, अे.के.(२०१२). *कौटूंबिक हिंसाचारापासून महिलांचे रक्षण करणारा अधिनियम २००५ व नियम २००६.* पूणे. हिंद लॉ हाऊस.

एस.एन.डी.टी.(२००५). *स्त्री अभ्यास क्रेंद्र.* मुंबई. एस.एन.डी.टी. विद्यापीठ.

Khandelwal, Tanisha. (2018). *Violence Against Women: A State Level Analysis In India.* New Delhi.. Ministry of Women & Child Development.

Dutta, Nilima.(1999). *Domestic Violence Tolerating theIntolerable Lawyers Collective.P.P. 4-9.*

Pandey, Sushma.(2008). *Phycho-Social Aspect of Domestic Violence.* New Delhi. Connect Publishing
Company.P.P.36.

महाजन, धर्मवीर एवं कमलेश महाजन.(१९९०). *भारतीय समाज:मुद्दे एवं समस्याए.* दिल्ली. विवेक प्रकाशन. *पृ.क्र. १३८.*

मौने, दिनेश.(२०१७). *कौटूंबिक हिंसाचार ग्रस्त महिलांच्या सामाजिक जीवनाचे अध्ययन— संदर्भ*
*लातूर जिल्हा*(शोध प्रबंध). स्वा.रा.ती.म. विद्यापीठ. नांदेड. *पृ.क्र. १०४.*

Khandelwal, Tanisha. (2018). *Violence Against Women: A State Level Analysis In India.* New Delhi.
Ministry of Women & Child Development.P.P.08.

फर्नांडिस, ऑड्री.(२०१०). *स्त्रियांवरील हिंसा: सार्वजनिक आरोग्याचा प्रश्न.* पूणे. तथापि ट्रस्ट. *पृ.क्र.१—१०.*

आगलावे, प्रदिप.(२००९). *भारतीय समाज: प्रश्न आणि समस्या.* नागपूर. श्री. साईनाथ प्रकाशन.

शर्मा, जि.एल.(२०१५). *सामाजिक मुद्दे.* जयपूर. रावत पब्लिकेशन्स्.

Scanned with CamScanner